# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/07/2023 (बुधवार) दुपार

---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील जगनाडे चौक काटोल येथे दिनांक १८/०७/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण प्रकाशराव मकेश्वर, वय ३६ वर्ष रा. काटोल हे इसाफ को ऑप. सोसायटी येथील मॅनंजर असून यातील इसाफ को ऑप सोसायटी या बॅकेने वैष्णवी मारोती चिचमलकर हिला कर्ज स्वरूपात ६००००/– रू दिले होते. यांनी कर्जाचा एकही हप्ता भरलेला नाही त्यांना हप्त्याचे पैसे मागणे करीता गेले तर त्या म्हणायच्या तुम्ही जास्तीचे पैसे घेता यातील आरोपी नामे– १) दिलीप गायकवाड, रा. काटोल २) प्रशांत बारई ३) संदिप खडसे रा. काटोल, ०३ महिला आरोपी व इतर सोबत आलेले २० ते २५ लोकांनी फिर्यादीस म्हटले कि तुम्ही लोकांना कर्ज देता तर इंशुरन्स कॉपी का देत नाहीत व इतर बाबी लक्षात का आणुन देत नाहीत असे म्हणुन बॅकेत एकाकी गोंधळ घालुन बॅकेतील खुर्च्या तोडफोड करून खिडक्याचे काच तोडुन शिवीगाळी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ४२७, ५०४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास लक्ष्मण रूढे पो.स्टे. काटोल हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील हनुमान मंदीर कडकडी महाराज देवस्थान समीती सावनेर येथे दिनांक १७/०७/२०२३ चे २०.३० वा. ते दिनांक १८/०७/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने मंदिराचे समोरील गेटचा ताला तोडुन मंदीराचे आत प्रवेश करून मंदिराचे आंत ठेवलेल्या दानपेटीचे दोन्ही ताले तोडुन त्यामधील लोकांकडुन दानपेटीत दान म्हणुन जमा झालेले अंदाजे ४०००/– रू चोरी करून घेऊन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुभाष राठोड मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर